# भारतातील बालकामगार समस्या - सद्यस्थिती व कारणे

**शिंदे निलेश प्रकाश**

**प्रस्तावना:**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये सुदृढ व संस्कारी मुले ही एक प्रकारची संपत्ती आहे. परंतु ही राष्ट्रीय संपत्ती अत्यंत दुर्लक्षित आणि कुपोषणासारख्या समस्यांनी ग्रस्त असलेली दिसून येते. देशाचे सुदृढ आणि कार्यक्षम नागरिक होण्यासाठी बालकांना जो किमान कौटुंबिक आणि आधार मिळायला हवा तो मिळतांना दिसून येत नाही. याउलट ज्यावेळी बालकांना प्रेमाची ऊब आवश्यक असते त्यावेळी त्यांना काही वेळा नाईलाजास्तव तर काही वेळा सक्तीने स्वत:ला आणि कुटुंबाला आधार देण्यासाठी कष्टप्रद काम करावे लागतात. जगाच्या पाठीवरील अनेक देशांमध्ये बालकामगार प्रथेला जे प्रोत्साहन मिळते ते यामुळेच. कारण बालकामगार अल्प मोबदल्यात काम करतात. ते असंघटित असल्यामुळे उपद्रवकारकही असत नाहीत.

औद्योगिक व्यवस्थेच्या निर्मितीनंतर सर्वसाधारणपणे उद्योग व्यवसायांच्या मालकांमध्ये कमी खर्चात सहज व सोप्या पध्दतीने आणि जलदपणे नफा कमावण्याची प्रवृत्ती निर्माण झाली म्हणून अल्प वेतनावर कारखान्यांमध्ये मुलांना नोकरीत ठेवण्याची पध्दत सुरु झाली. इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात बालकामगारांची परिस्थिती बिकट होती. प्रौढ व्यक्तीच्या तुलनेत महिलांचे आणि लहान मुलांचे श्रम अल्प वेतनावर उपलब्ध होत असल्यामुळे मोठ्या उद्योग - धंद्यामध्ये मालक, महिला व मुले यांच्याकडून अल्प वेतनावर अधिक काम करुन घेतले जात असे.

भारत हा कृषीप्रधान देश असून भारताने आता आधुनिक औद्योगिक जीवन पध्दतीकडे वाटचाल सुरु केली आहे. म्हणजेच भारताची वाटचाल ग्रामीण जीवनपध्दतीकडून औद्योगिक नागरी जीवन पध्दतीकडे सुरु झाली आहे. यातूनच बालकामगारासारख्या समस्या डोके वर काढत आहेत. आधुनिक काळात सामाजिक जागरुकता असूनही ही समस्या कायम असल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत समाजातील काही व्यक्तींची खालावलेली सामाजिक व आर्थिक स्थिती याचे मुळ कारण दिसते.

**बालकामगार संकल्पना व व्याख्याः**

बालकामगार हा शब्द दोन शब्दापासून तयार झाला आहे. यातील बाल म्हणजे बालक आणि कामगार म्हणजे पैसे मिळविण्यासाठी काम करणारी व्यक्ती. लहान वयात जेव्हा बालक (मुल) काम करते तेंव्हा या मुलास बालकामगार असे म्हणतात. कोणतेही मूल जेव्हा अशा कामामध्ये व्यस्त राहत असेल की, ज्यामुळे त्याच्या शारीरीक, मानसिक वाढीवर त्याचा विपरीत परिणाम होऊन त्याची शारीरिक व मानसिक वाढ खुंटत असेल व विकास होण्यास अडथळा निर्माण होत असेल तर त्यास बालकामगार म्हणता येईल. बऱ्याचदा कुटुंबातील मुलं देखिल कुटूंबाला आर्थिक हातभार म्हणून काम करत असतात. यामुळे त्यांच्या शारीरिक, सामाजिक व मानसिक वाढीवर खूप वाईट परिणाम होतो. अशी मुलं बालकामगार म्हणून ओळखले जातात.

भारतीय राज्यघटना व बालकामगार कायदा १९८६ नुसार, ज्या व्यक्तींनी आपल्या वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली नाहीत अशा सर्व कामगारांना बालकामगार असे म्हटले जाते.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या मते, ''बालमजुरांमध्ये अपरिपक्व वयात प्रौढासारखे जीवन जगणाऱ्या मुलांचा समावेश होतो, आरोग्याला तसेच मानसिक आणि शारीरिक विकासाचा हानिकारक परिस्थितीमध्ये, तुटपुंज्या वेतनावर त्यांना तासनतास काम करावे लागते. बऱ्याचजणांना कुटूंबापासून दूर रहावे लागते. उज्ज्वल भविष्यासाठी अर्थपूर्ण शैक्षणिक संधीपासून बऱ्याच वेळा अशी मुले वंचित राहतात.

**बालकामगार समस्या - सद्यस्थिती व कारणे :**

बालकामगार ही विश्वव्यापी समस्या आहे. विकसित देशापेक्षा विकसनशिल देशांमध्ये बालकामगार समस्येने उग्र रुप धारण केलेले दिसते. उपजीवीकेसाठी काम करणारी साधारत: चौदा वर्षाखालील वयाची मुले ज्या व्यवसायात कौशल्याची व विशेष प्राविण्याची गरज नसते अशा हलक्या कामात गुंतलेले दिसतात.

पालकांचे दारिद्र्य, मुलांची शिक्षणाविषयीची अनास्था, संघटनेचा अभाव, कामगार संघटनांची उदासिनता ही बालकामगारांच्या उदयाची ठळक कारणे दिसतात. १९७१ च्या जनगणनेनुसार मोठ्या शहरात स्थलांतरीत बालकामगारांची संख्या ९० लाख होती. मुंबईतील ७५

पेक्षा जास्त अधिक बालकामगार हे स्थलांतरीत आहेत. हे बालकामगार गलिच्छ वातावरणातील उपहारगृहात कपबश्या विसळणे, कचरा पेट्यांमधून चिंध्या वेचणे, घरकाम या स्वरुपाच्या व्यवसायात प्रामुख्याने दिसून येतात. तसेच हे बालकामगारांपैकी ३२ टक्के मुले व ३४ टक्के मुली ही कामे करतांना दिसून आली.

बालकामगारांपैकी ९० टक्के मुले ही असंघटित क्षेत्रात असून तेथील परिस्थितीकडे संबंधित निरीक्षक अधिकारी किंवा समाज फारसे लक्ष देत नाही. त्यामुळे त्यांचे सातत्याने शोषण होत राहते. आशिया खंडामध्ये सर्वात जास्त बालकामगार हे भारत, पाकीस्तान बांगलादेशात आढळतात. दक्षिण आशियातील २.९ कोटी बालकामगारांपैकी १.७ कोटी भारतात आहेत. म्हणजे भारतातील एकूण कामगारांपैकी बालकामगारांची संख्या ६ टक्के आहे. भारतामध्ये आंध्रप्रदेश या राज्यात सर्वात जास्त बालकामगार दिसून येतात. उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश तिसऱ्या स्थानावर आहे. मध्य प्रदेशातील दामोह जिल्ह्यामध्ये सर्वाधिक बालकामगार आढळतात. भारताच्या ईशान्य भागात बालकामगारांची स्थिती तर अजूनच भयावह आहे. तिथे बालमजुरीचे रुपांतर मनुष्य तस्करीत झाले आहे याशिवाय त्यांच्यात व्यसनाधिनताही भरपुर प्रमाणात आहे.

बिहारमधून जवळपास २५००० बालकामगार प्रत्येक वर्षी दुसऱ्या राज्यात पाठविले जातात. बालकामगारांची वास्तविक संख्या मोजण्याची विशिष्ट पध्दत आपल्याकडे रुढ नाही परंतु भारतात असे कोणतेच राज्य नाही की ज्याठिकाणी बालकामगार आढळून येत नाही. फरक एवढाच आहे की, काही ठिकाणी बालकामगारांचे प्रमाण कमी - जास्त आहे. भारतातून दरवर्षी एक लाखाहून अधिक मुलं मुली बेपत्ता होतात. गायब झालेल्या बालकांची अनेकदा मजूर म्हणून विक्री केली जाते तर बिहार, उत्तरप्रदेश, ओरिसा, झारखंड व इतर ठिकाणाहून काही एजन्सीव्दारे मुलांची तस्करीसुध्दा केली जाते.

महाराष्ट्रामध्ये कोकण, मराठवाडा, विदर्भ हे मागासभाग समजले जाते. याठिकाणची प्रगती अगदी कमी प्रमाणात आहे व शिक्षणाचे प्रमाणही कमी आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून याठिकाणी बालकामगारांचे प्रमाणही जास्त दिसते. मुंबई, पुणे, नाशिक, नागपुर या ठिकाणी औद्योगिक क्रांती झाल्यामुळे या उद्योगधंद्यात जशी कामगारांची संख्या वाढली तशी बालकामगारांची संख्याही वाढतांना दिसून येते.

**ग्रंथसूची:**


- आहुजा राम (१९९७): सामाजिक समस्याएँ, रावत पब्लिकेशन्स, जयपुर
- कुलकणी, पी.के. (२००६): समाजशास्त्रातील सैध्दांतीक दृष्टीकोन, मंगेश प्रकाशन, नागपुर
- चांदे, प. रा. (२००८): गुन्हेगारशास्त्र आणि शिक्षा पध्दती, मुकूंद प्रकाशन, ठाणे.
- मुळे, रा.श. (१९९८): शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्या बुक्स पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
- नाडगोंडे, गुरुनाथ (१९९९): सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापुर
- पाटील, ज.फा. (१९९७): भारतीय कामगार समस्या, क़ॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.
- सबनीस, एस. एन. (२०१५): बालकांचे कायदे, मुकूंद प्रकाशन, ठाणे.
- शर्मा रा. व. (१९९६): शैक्षणिक समाजशास्त्र, अटलांटिक पब्लिशर्स, नवी दिल्ली
- शेख आर. के. (२०१४): बालकामगार - समस्या व समाधान, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव